**MHSO130003982015**

## निशाणी क्र. ४५ वरील आदेश

प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द होऊन त्यांना उलटतपास घेण्याची परवानगी मिळावी म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, वादी यांनी नि.३१ व ३४ वर त्यांच्या साक्षीदारांचे सरतपास अभिलेखावर दाखल केले आहेत. सदरचे प्रकरण हे दिनांक ०४/०१/२०२० रोजी वादीच्या साक्षीदाराच्या उलटतपासाठी ठेवण्यात आले होते. परंतु, सदर दिवशी प्रतिवादी क्र.१ हे नोकरीच्या ठिकाणी पुणे येथे असल्याने ते हजर राहु शकले नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ यांना पुढील तारखेची कल्पना नसल्याने काही तारखा गैरहजर होते. त्यामुळे ते सदर प्रकरणात हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांना न्यायाच्या दृष्टीने उलटतपास घेण्याची संधी मिळावी व त्यांच्या विरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करावा अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जास वादी यांनी म्हणणे दिले असून त्यामध्ये त्यांनी प्रतिवादीचा अर्ज खरा नाही, कायदेशीर नाही. त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांना ऐकले. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी साक्षीदार क्र. १ प्रथमेश यांचा नि.क्र. ३१ वर त्यांचा सरतपास दिनांक १६/०९/२०१९ रोजी दाखल केला असून सदर सदर दिवशी प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर होते तरीही त्यांना उलटतपास घेण्यास मुदत दिली असल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक ०४/०१/२०२० रोजीही प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर राहिले व त्यांच्या विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यानंतर वादीने साक्षीदार क्र.२ गजानन यांचा नि.क्र.३४ वर सरतपास दिला. परंतु प्रतिवादी गैरहजर

राहिल्याने त्यांचा उलटतपास अद्यापपर्यंत घेतलेला नाही. जरी असे असले तरी वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन पृथ्थक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादींचे म्हणणे ऐकणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल असे वाटते. तसेच प्रतिवादी यांना उलटतपासाची संधी दिल्यास सदर दाव्याचा गुणदोषांवर निकाल होण्यास मदतच होणार आहे. तसेच या प्रकरणातील निशाणी क्र.५१ वर या न्यायालयाने आदेश पारीत करुन प्रतिवादी क्र.३ यांना म्हणणे देण्यासाठी संधी दिली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी जरी उलटतपास घेण्यास दिरंगाई केली असली तरी त्यांच्यावर योग्य तो दंड आकारुन सदरची दिरंगाई भरुन काढता येईल. सबब प्रतिवादी क्र.१ यांचा सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज निशाणी क्र. ४५ मंजूर करण्यात येतो व त्यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी पुढील तारखेला वादीच्या साक्षीदारांना प्रत्येकी रक्कम रुपये ५००/- भत्ता म्हणून द्यावा व वादींच्या साक्षीदारांचा उलटतपास घ्यावा.

Digitally signed by Santosh Bholaram Vijaykar
Date: 2023.08.19 16:44:22 +0530

बार्शी.
दिनांकः १९/०८/२०२३.

(एस.बी. विजयकर)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बार्शी.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B. Vijaykar, Jt.C.J.J.D.&J.M.F.C. Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/08/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 19/08/2023 |